# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दिनांक :- २१/०६/२००५.

आज दि. २१/०६/२००५ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सुचना क्र. ०३, दि. ०९/०६/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. वैती चंद्रकांत सिताराम | उपमहापौर |
| ३) | श्री. पाटील मोहन मधुकर | सभापती, स्थायी समिती |
| ४) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सभागृह नेता |
| ५) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्ष नेता |
| ६) | श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस | सभापती, महिला व बालकल्याण समिति |
| ७) | श्रीम. सपार उमा विश्वनाथ | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिति |
| ८) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ९) | श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज | सदस्य |
| १०) | श्री. पाटील चिंतामण कमलाकर | सदस्य |
| ११) | श्री. पाटील अशोक बळवंत | सदस्य |
| १२) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| १३) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| १४) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १५) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १६) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १७) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १८) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १९) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| २०) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| २१) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| २२) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| २३) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| २४) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| २५) | श्री. पाटील रोहिदास शंकर | गटनेता |
| २६) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २७) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २८) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २९) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| ३०) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | सदस्य |
| ३१) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| ३२) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| ३३) | श्री. माळी रविंद्र भीमदेव | गटनेता |
| ३४) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३५) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३६) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ३७) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ३८) | श्रीम. पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ३९) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ४०) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ४१) | श्री. पटेल आसिफ गुलाम | सदस्य |
| ४२) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ४३) | श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत | सदस्या |
| ४४) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ४५) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४६) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | सदस्या |
| ४७) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ४८) | श्री. मेंडोसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४९) | श्री. पाटील रोहिदास आत्माराम | सदस्य |
| ५०) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ५१) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ५२) | श्रीम. भामरे उर्मिला कोमल | सदस्या |
| ५३) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ५४) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ५५) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ५६) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ५७) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| ५८) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ५९) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ६०) | श्री. पाटील ध्रुवकिशोर | सदस्य |
| ६१) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ६२) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ६३) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ६४) | श्रीम. रांजणकर मुक्ता प्रविण | सदस्या |
| ६५) | श्री. पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ६६) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ६७) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ६८) | श्री. म्हात्रे तुळशिदास दत्तू | सदस्य |
| ६९) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ७०) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ७१) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ७२) | श्री. जैन रमेश धरमचंद्र | सदस्य |
| ७३) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |
| ७४) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ७५) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| ७६) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ७७) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## <u>गैरहजर सदस्य</u>

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| ३) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ४) | श्रीम. मेंन्डोसा मायरा गिल्बर्ट | सदस्या |
| ५) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ६) | श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ | गटनेता |

## रजेचा अर्ज आलेले सदस्य

१) श्री. शहा शशिकांत रतिलाल सदस्य

वरीलप्रमाणे महासभेकरिता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा. महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यास सांगितले. त्यानुसार सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**मा. महापौर :-**

प्र. सचिवांनी निवडणुकीच्या कामकाजाला सुरुवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २० चे वाचन केले.)

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते की, ज्या दोन सन्मा. सदस्यांची जी निवडणुक लावलेली आहे तर त्यांचा कालावधी हा किती आहे?

**प्र. सचिव :-**

जे सदस्य राजीनामा देण्याच्या कालावधी एवढे होते. त्यांचा जो कालावधी आहे, तेवढाच कालावधी त्यांना उरलेला आहे. उर्वरित कालावधी म्हणजेच दि. ३१ जुलैला अखेर ते निवृत्त होतील.

**रिटा शाह :-**

म्हणजेच एक ते दिड महिना.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, ह्यांची पदे रिक्त होऊन इतका अवधी का घेतला गेला? याच्यामध्ये त्याचे इलेक्शन का लावले गेले नाही? त्याचे जरा कारण सांगावे.

**प्र. सचिव :-**

विहीत मुदतीत निवडणुक कार्यक्रम जाहिर केल्यानंतर तीन उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. सन्मा. सदस्या सौ. अनिता जयवंत पाटील आणि सन्मा. सदस्य श्री. रोहिदास आत्माराम पाटील व सन्मा. सदस्य श्री. मिलन वसंत म्हात्रे.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवागीने बोलतो की, निवडणुकीला इतका अवधी का झाला? निवडणुक का घेतली नाही त्याचे जरा मला कारण तरी सांगा.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौरांच्या परवागीने बोलत आहे की, आपल्याकडे दोन सन्मा. सदस्यांनी राजीनाम दिला होता आणि या सन्मा. सदस्यांनी स्थायी समितीचा राजीनामा दिल्यानंतर त्याच्यात अशी काही विहित मुदत नाही की, ह्या मुदतीमध्ये निवडणुका झाल्या पाहिजेत. निवडणुका थोड्याशा उशिरा होतात, कारण मा. महापौर, मा. उपमहापौर यांची निवडणुक झाली व त्यानंतर प्रभाग समितीच्या निवडणुका झाल्या आणि त्यामुळे ह्या निवडणुकीला थोडासा उशीर हा झालेला आहे.

**प्र. सचिव :-**

मा. महापौरांच्या वतीने बोलतो की, विहित मुदतीत तीन अर्ज आलेले होते. सन्मा. सदस्या सौ. अनिता जयवंत पाटील, सन्मा. सदस्य श्री. रोहिदास आत्माराम पाटील आणि सन्मा. सदस्य श्री. मिलन वसंत म्हात्रे असे तीन उमेदवार होते आणि अर्ज मागे घेण्याच्या कालावधीतसुद्धा कोणीही उमेदवारांनी आपला अर्ज मागे घेतलेला नाही. त्यामुळे आजच्या निवडणुकीसाठी तीन उमेदवार उभे असल्यामुळे व दोन जागा निवडायच्या आहेत. त्यामुळे मतदान घेणे आवश्यक आहे. कोणाला अजून अर्ज मागे घ्यायचा असेल तर ते घेऊ शकतात.

**मोहन पाटील :-**

ज्या सन्मा. सदस्यांना अर्ज मागे घ्यायचा असेल तर घेऊ द्या. त्यांना पंधरा मिनिटाची वेळ देण्यांत यावी.

**प्र. सचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने दहा मिनिटाचा अवधी देण्यांत येत आहे.

**मोहन पाटील :-**

आपण त्यांना वेळ दिलेली आहे. तरीसुद्धा आपल्याला कोणत्या पद्धतीने प्रक्रिया पुर्ण करतांना कशा पद्धतीने मतदान करायचे ह्याची माहिती सभागृहाला दिली तर बरे होईल. त्याबाबत सचिवांनी माहिती द्यावी.

**प्र. सचिव :-**

मतपत्रिकेतील सन्मा. सदस्यांच्या नांवानुसार क्रमांक असे आहेत. क्र. ०१ वर सन्मा. सदस्या अनिता जयवंत पाटील, क्र. ०२ वरती सन्मा. सदस्य मिलन वसंत म्हात्रे, क्र. ०३ वर सन्मा. सदस्य रोहिदास आत्माराम पाटील आहेत. सुचना आहेत की, प्रत्येक सदस्यांस दोन मते द्यायचा अधिकार आहे व मत फुलीने नोंदवायचे आहे. तुम्ही आपले मत कोणत्याही उमेदवाराला तुमच्या पसंतीप्रमाणे देऊ शकता. दोनपेक्षा जास्त फुल्या करु नका. दोन मते देण्याचा अधिकार आहे. उमेदवाराच्या नांवासमोरील रकान्यात मताची खुण करावयाची आहे. सभासदांनी मतपत्रिकेवर स्वाक्षरी किंवा ओळख पटेल असा शब्द लिहिला किंवा खुण केली तर मतपत्रिका खालील कारणामुळे रद्द होईल. मतपत्रिका स्थळ विभागामधून फाडून घेण्यासाठी छिद्रांकित मर्यादित रेषेच्या परफोरेशन स्थळ मुद्रेचा ठसा उमटविला नसेल तर मतपत्रिका मत निर्देश खुण फुली नसेल किंवा ती संशयास्पद असेल तर मतपत्रिकेवर दोनपेक्षा अधिक फुल्या असतील तर मतपत्रिका रद्द होऊ शकते.

**आसिफ शेख :-**

सचिव साहेब, एका मतपत्रिकेवर दोन फुल्या मारायच्या आहेत ना?

**प्र. सचिव :-**

एका रकान्यात तुमच्या पसंतीप्रमाणे दोन सन्मा. सदस्यांना देऊ शकता.

**आसिफ शेख :-**

दोन सन्मा. सदस्य निवडुन द्यायचे आहेत. हे बरोबर आहे ना?

**गजानन भोईर :-**

मा. महापौर मॅडम, मला एक थोडीशी सुचना करायची होती की, मला वाटते की, सर्व सन्मा. सभासदांनासुद्धा त्याचा फायदा घेता येईल. आपल्याला कल्पना असेल की, आपल्या मिरा भाईंदरमध्ये प्रविण रोहिदास पाटील ह्या नावाचे कॉलेज आहे आणि आता त्याचा ७१ टक्के रिझल्ट लागलेला आहे आणि एस.टी., एन.टी., ओ.बी.सी. आणि एस.बी.सी. यांना फुकट शिक्षण आहे. तरी मला तुम्हांला आणि साहेबांना तसेच सर्व सभासदांना एवढेच सांगायचे आहे की, ह्याचा फायदा घ्या. तरी ह्या चार जातींना फुकट शिक्षण आहे तरी ज्याला माहिती नसेल त्याच्या माहितीकरिता मी सांगतो. पॉलिटेक्निकला तीन वर्षासाठी फ्री शिक्षण आहे. हे सर्वांच्या माहितीसाठी सांगतो.

**प्र. सचिव :-**

दिलेला अवधी हा पुर्ण झालेला आहे. आता मतदानाच्या प्रक्रियेला सुरुवात करीत आहोत. कृपया सन्मा. सदस्यांनी मतपेटी बघायची आहे. मतदानाला सुरुवात करत आहोत. खाली बसलेले अधिकारी हे सन्मा. सदस्यांचे नांव पुकारणार. ज्याप्रमाणे ते नांव पुकारतील त्याप्रमाणे सन्मा. सदस्यांनी यायचे आहे. मतपत्रिकेच्या ठिकाणी श्री. संजय गोखले हे आहेत. ते मतपत्रिका देतील. तरी आपण वर येऊन दोन काऊंटरमध्ये दोन लाल पेन्सील ठेवलेल्या आहेत. त्या लाल पेन्सीलने फुली मारायची आहे. फुली मारल्यानंतर मतपत्रिका ही मतपेटीत टाकायची आहे. त्या अगोदर आपल्या सर्व सन्मा. सदस्यांना मतपेटी दाखविण्यांत येत आहे. मतपेटी पुर्णपणे रिकामी आहे. आपण मतपेटी व्यवस्थित पाहून घ्यावी. मतपेटीची चावी मा. पिठासीन अधिकाऱ्यांकडे देत आहे व मतदानाच्या प्रक्रियेस सुरुवात करीत आहे. मतदानाची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर मा. महापौर तथा पिठासिन अधिकारी मतदानाचा निकाला घोषित करीत आहेत.

**प्रकरण क्र. २० :-**

स्थायी समितीच्या दोन सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ कलम २३ च्या तरतुदीनुसार नेमणुक करणे.

**ठराव क्र. :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ चे कलम २३ अन्वये स्थायी समिती सभासद दोन रिक्त पदांवर नेमणुक करणेसाठी निश्चित केलेल्या तारखेला व वेळेला नामनिर्देशन पत्र मागविली असता, एकुण ३ सदस्यांनी नामनिर्देशन पत्र दाखल केली. नामनिर्देशन पत्र मागे घेण्यासाठी निश्चित केलेल्या तारखेस व वेळेत तसेच निवडणुक प्रक्रिया सुरु करण्यांच्या आधी ३ सदस्यांपैकी कोणीही नामनिर्देशन पत्र मागे न घेतल्याने निवडणुकीसाठी ३ उमेदवार आहेत.

स्थायी समिती सभासद पद दोनच रिक्त असल्याने व उमेदवार ३ असल्याने गुप्त पद्धतीने मतदान घेतले असता (१) श्रीम. अनिता ज. पाटील ह्यांना ५२ इतकी, (२) श्री. मिलन व. म्हात्रे ह्यांना ३६ इतकी व (३) श्री. रोहिदास आ. पाटील ह्यांना ५५ इतकी मते मिळाली.

वरील ३ उमेदवारांपैकी (१) श्रीम. अनिता ज. पाटील व (२) श्री. रोहिदास आ. पाटील ह्यांना जास्त मते मिळाल्याने हे दोन्ही उमेदवार निवडून आल्याचे मी घोषित करीत आहे. तसेच मुंबई प्रांतिक

महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम २३ मधील तरतुदीनुसार निवडून आलेल्या उमेदवारांची मुदत दि. ३१/०७/२००५ पर्यंतच राहिल.

**सही/-**
**पिठासिन अधिकारी / महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(मा. महापौरांनी मा. स्थायी समिती सभासद पदी निवडून आलेल्या सन्मा. सदस्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.)

**मा. महापौर :-**

सभेस उपस्थित असलेले मा. उपमहापौर, मा. आयुक्त, मा. विरोधी पक्ष नेते, मा. सभागृह नेते, मा. प्र. सचिव, सर्व नगरसेवक-नगरसेविका, अधिकारी वर्ग तसेच पत्रकार बंधू आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली असून सभा संपल्याचे मी जाहिर करीत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ०१.३५ वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**